# दिनांक 01/03/2025

**1.** गोरेगांव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/02/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे शिरवली गावच्या हददीत मांजरवणे फाटा येथे, आरोपीत रा.धामणसाई ता.रोह यांनी पिकअप क्र.एम.एच.06 सीपी 1150 मधुन एक चोरी केलेला गोवंश त्यास खाण्यास चारापाणी न ठेवता कत्तलीसाठी वाहतुकीस परवानगी नसल्याचे माहित असताना देखील वाहतुक करुन घेवुन जात असताना मिळुन आला. सदर गुन्ह्यातील आरोपी यांना दिनांक वेळ 28/02/2025 रोजी 04:33 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत गोरेगांव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.15/2025, 303(2),3(5), महाराष्ट्र पशू संरक्षण अधि 1976 चे क 5(अ),9,9(अ),9(ब) प्राणी क्रुरतेने प्रतिबंधचा कायदा 1960 चे कलम 11(1) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पांडुरंग सानप हे करीत आहेत.

**2.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/02/2025 रोजी 20:20 वा च्या सुमारास मौजे कर्जत रेल्वे स्टेशन पुर्व बाजु पुणे दिशेकडील रेल्वे कमाणीच्या आतमध्ये शिरतास ता.कर्जत येथे फिर्यादी व साक्षीदार यांना दि.24/02/2025 रोजी 20.20 ते 20.55 या दरम्यान वरील नमुद 1 ते 4 अनोळखी ईसम यांनी दगडाने व हातातील कडयाने संगणमत करुन डोक्यात मारहाण करुन दुखापत केली.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.54/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/केशव नागरगोजे हे करीत आहेत.

**3.** महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/02/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे करंजाडी बौध्दवाडी येथे कासारे यांचे घरासमोरील अंगणात ता महाड येथे फिर्यादी रा. करंजाडी बौध्दवाडी ता.महाड हे साक्षीदार क्रमांक 1 यांचे घरी टी.व्ही बघत असताना घराचे बाहेरुन शिवीगाळी व ओरडण्याचा आवाज आल्याने फिर्यादी हे बाहेर येवुन पाहिले असता अंगणात आरोपी क्रमांक 1,2 व साक्षीदार क्र.1 हे एकमेकांना शिवीगाळी करित अंगावर जात असल्याचे दिसल्याने फिर्यादी हे सदरची भांडणे सोडविण्याकरिता गेले असता त्या गोष्टीचा राग आरोपीत क्रमांक 1 व 2 यांना येवुन त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन आरोपीत क्रमांक 1 यांने फिर्यादी यांना पाठीमागुन हाताने धक्का मारुन खाली पाडले असता फिर्यादी यांचे दोन्ही

पायांना खरचटले असुन आरोपीत क्रमांक 2 याने त्याचे हातातील काठीने फिर्यादी यांचे डावे पायाचे पंजाचे बोटावर उपट टाकुन पायास दुखापत केली त्यानंतर तेथे साक्षीदार क्र 2 हे आले असता त्यांना सुध्दा आरोपीत क्रमांक 1 व 2 यांनी शिवीगाळी करुन आरोपीत क्रमांक 2 यांनी कानाखाली मारली.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.नं.6/2025, बी.एन.एस 2023 चे कलम 118 (1),115 (2), 352, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/विनोद महाडिक  हे करीत आहेत.

**4.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/11/2024 रोजी 21:00 वा च्या सुमारास मौजे तुडाळ येथील पंक्चरच्या दुकानाजवळ, ता.अलिबाग येथे संशयीत आरोपीत यांचेपैकी कोणाचे तरी अज्ञात वाहनाने महिला फिर्यादीचे पती रा. तुडाळ आदीवासी पो.नवगाव, ता.अलिबाग यांना ठोकर लागून अपघात होवून त्या अपघातात फिर्यादीचे पतीस लहान मोठया स्वरुपाच्या दुखापती होउन अपघाताची खबर न देता निघून गेले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.36/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, 134, भारतीय न्याय संहिता 2023  चे कलम 106(1),281,125(A),125(B) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/मासे हे करीत आहेत.

**5.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 14:00 वा च्या सुमारास मौजे साळोख, ता.कर्जत येथे फिर्यादी व साक्षीदार हे मौजे साळोख येथे विजचोरी चेक करायचे शासकिय काम  करीत असताना साळोख गावातील लोक एकत्रित जमुन कारवाई करू नका व येथून निघून जा असे बोलून तेथे असलेला आरोपी क्र 01 याने साक्षीदार याचे गालात चापट मारली त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार हे गावाचे बाहेर रोडवर आले असता आरोपीत क्र 2 ते 7 यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथला निर्माण केला तसेच आरोपीत क्र 1 याने दगड फेकून मारून शासकिय वाहन क्र. एम.एच.05 बी.एस.4487 या गाडीचे डावेबाजुचे पाठीमागील खिडकीची काच फुटून नुकसान झाले असून साक्षीदार याचे डावे गालावर व मानेवर लागून दुखापत केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.24/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 132, 121(1)189(2)191(2)190,324(3)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई दहातोंडे हे करीत आहेत.

**6.** पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/02/2025 रोजी 10:00 वा च्या सुमारास महिला फिर्यादी यांचे माहेरी त्यांचे आईचे राहते घरात ता.सुधागड येथे फिर्यादी या त्याचे माहेरी आईचे घरी असतना आरोपीत हे फिर्यादी यांचे घरी आले व फिर्यादी या बेडरूममध्ये कपडयांच्या घडया घालीत असताना त्यांना मागून येवून पकडून त्यांची चेह-यावर पप्पी घेतली म्हणून फिर्यादी या त्यांना ढकलून बाहेर येत असताना आरोपीत हा सुदधा फिर्यादी यांचे मागे हॉलमध्ये येवून फिर्यादी यांचा परत गाउन पकडून त्यांना आत खेचू लागले त्यावेळी त्यांचा गाउन फाटून त्यांचे मनास

लज्जा उत्पन्न झाली`.

याबाबत पाली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.13/2025, BNS section 74 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोना/वृषाली मांन्टे ह्या करीत आहेत.

**7.** कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे गारभट येथील चिकण दुकाणासमोर ता.रोहा येथे महिला फीर्यादी रा. गारभट चिंचवली जर्फे आतोणे ता. रोहा या एक महीण्यापुर्वी माहेरी राहण्यासाठी गेल्या आसता आरोपीत रा.पुगाव ता.रोहा हा फिर्यादी यांचे माहेरी गारभट येथे जाउन तु किती दिवस माहेरी राहणार आहेस तु घरी नांदायला येणार नाहीस का? असे बोलल्याने दोघांमध्ये शाब्दीक बाचाबाची होउन आरोपीत यांने शीवीगाळी करुन हाताबुक्याने मारहाण केली व बाजुलाच पडलेली लोखंडी सळई डोक्यात मारुन दुखापत केली.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.15/2025, भारतीय न्याय संहिता 2023चे कलम 118(1),115,352 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/चेतन कुथे हे करीत आहेत.

**8.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/02/2025 रोजी 15:30 वा मौजे मेघा टॉकीजचे मागे, हरितारा बिल्डींग बी. विंग फ्लॅट नं. 301 व 303मध्ये, ता.अलिबाग येथे एकुण 4,57,000/- रुपये व किमतीचे सोन्याचे दागीने, रोख रक्कम व मोबाईल कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी व त्यांचे शेजारी राहणारे साक्षीदार यांचे घरात कुलपासह कडीकोयंडा उपकुन त्यावाटे घरात शिरून चोरी केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 37/2025, भा.न्या.सं. कलम 331(3), 303(2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोउनि/मुंजाबा सौंदरमल हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 28.02.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 184 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,85,200/-रुपये इतका दंड आकारला आहे.